# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली
**E-mail** – dpmgadchiroli2017@gmail.com


## कंत्राटी पदभरती

नियमित लसिकरण कार्यक्रम बळकटीकरण करण्यासाठी आदिवासी/ Aspirational जिल्हयांकरिता विशेष कृती नियोजन (Special Action Plan for Tribal Districts) अंतर्गत मंजूर झालेली खालील रिक्त असलेले ६ पदे खालील पदे दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंतच्या कालावधीकरीता कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी अर्हताप्राप्त इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | मुळ पदाचे नांव | अंतर्गत पद | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | मानधन (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **पर्यवेक्षक** | लसिकरण क्षेत्र नियंत्रक | ६ | Any graduate with Typing skill, Marathi -30 wpm , English 40 wpm with MSCIT & should have own vehical (with valid driving licence) | SC-1<br>ST-1<br>VJ/NT-1<br>OBC-1<br>SEBC-1<br>EWS-1 | २०,०००/- |

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) सदरची पदे निव्वळ कंत्राटी/करार तत्वावरील असून राज्य शासनाची नाहीत.

२) पदांसमोर नमूद मानधन हे एकत्रीत मानधन असून त्याव्यतीरीक्त इतर कोणतेही भत्ते देय नाहीत.

३) निवड झालेल्या उमेदवारांना दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंतच्या कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. त्यापुढील कालावधीकरीता राज्य कुटूंब कल्याण कार्यालय, पुणे यांचेकडून कार्यक्रम सुरु ठेवण्यास व पदांना मंजूरी मिळाल्यानंतर तसेच मागील कालावधीत काम समाधानकारक असल्यासच पुढील ११ महिण्याचे कालावधीकरीता नेमणूक दिली जाईल. पुनर्नियुक्तीबाबत, शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

४) उपरोक्त नमुद संपूर्ण अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी ए-४ साईज कागदावर संगणकीकृत किंवा टंकलिखीत केलेल्या सोबत जोडलेल्या विहित नमूण्यातील अर्जातच परिपुर्ण माहिती भरुन संपूर्ण आवश्यक स्वसाक्षांकित दस्ताऐवजासह (वयाचा पुरावा, पदवी प्रमाणपत्र व अंतिम वर्षाची/ सेमिस्टरची गुणपत्रिका, जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, उच्च अर्हता प्रमाणपत्र, संगणक प्रमाणपत्र, टंकलेखन प्रमाणपत्र, शासकिय/निमशासकिय संस्थेतील कामाचे अनुभव प्रमाणपत्र, वाहन नोंदणी प्रमाणपत्र व वाहन चालविण्याचा परवाना इत्यादी) आपले अर्ज **राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, १ ला माळा, आरोग्य विभाग, जि.प. गडचिरोली** या पत्यावर **दिनांक २५/०९/२०२० रोजी सांयकाळी ५.४५ वाजेपर्यंत (कार्यालयीन कामकाजाचे दिवशी)** नोंदणीकृत डाकेने अथवा समक्ष सादर करावेत. नमूद मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज किंवा हरकती यांचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

५) उमेदवारांची निवड ही निव्वळ गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येणार असून त्याकरीता कोणतीही लेखी परिक्षा अथवा मुलाखत घेण्यात येणार नाही. उमेदवारांच्या निवडीकरीता संबधित पदाची किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या अंतिम वर्षाच्या/सेमिस्टरच्या टक्केवारी ला ७० गुण, पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा संबधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता धारण करित असल्यास १० गुण व शासकिय संस्था, विभाग, शासन अंगीकृत संस्था यांचेकडील अनुभव धारण करित असल्यास प्रत्येक १ वर्षाकरीता ४ गुण (जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत २० गुण) याप्रमाणे एकूण १०० गुणांच्या आधारे गुणवत्तेनूसार अंतिम निवड करण्यात येईल.

६) विहित मुदतीत प्राप्त अर्जांची छाननी करुन उमेदवारांच्या अर्जाच्या पात्रतेबाबत तसेच गुणांकनाबाबत यादी जिल्हा परिषद गडचिरोलीचे संकेतस्थळ www.zpgadchiroli.in वर प्रसिद्ध करण्यात येईल. याकरीता उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविल्या जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देणे आवश्यक राहील.

७) अर्जासोबत आवश्यक सर्व शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र तसेच पुराव्यादाखल इतर दस्ताऐवजांच्या साक्षांकित प्रती जोडून लिफाफ्या मध्ये बंद करुनच अर्ज सादर करावे व त्यावर ठळक अक्षरात **"लसिकरण क्षेत्र सनियंत्रक या पदाकरीता अर्ज "** व **"जातीचा प्रवर्ग ..........."** असे नमूद करावे.

८) विहित नमून्यात नसलेले, विहित मुदतीनंतर आलेले, अपूर्ण दस्ताऐवज असलेले व अपुर्ण भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

९) अर्जावर विहित ठिकाणी अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो लावावे.

१०) राखीव प्रवर्गातील उमेदवाराने जात प्रमाणपत्र (असल्यास जात वैधता प्रमाणपत्र) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त पदांकरीता राखीव प्रवर्गातील पुरेशे उमेदवार उपलब्ध न झाल्यास राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांचेकडील दिनांक २०/०७/२०१६ च्या परिपत्रकानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचा निवडीकरीता विचार करण्यात येणार असल्याने खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना सुद्धा अर्ज सादर करण्याची मुभा राहिल.

**११) सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) प्रवर्गाचे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे सदर प्रवर्गाच्या उमेदवाराची अंतिम निवड करुन ठेवण्यात येईल. परंतू शासन स्तरावरुन पुढील सुचना आल्यानंतरच संबधितास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल.**

१२) सदरची पदे ही पर्यवेक्षीय कामाकरीता असल्याने पुरुष उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

१३) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनूसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे **दिनांक २५/०९/२०२० रोजी** उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ३८ वर्षे (राखीव प्रवर्गाकरीता कमाल वय ४३ वर्षे) राहील.

१४) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या वेळी उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१५) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, राजकिय वा प्रशासकिय दबाव तंत्राचा वापर किंवा अनूचीत मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्पावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

१६) अनूभवाच्या गुणाकरीता शासकिय/निमशासकिय संस्थेतील कामाचे अनुभवच ग्राहय धरण्यात येईल. असे अनुभव हे उमेदवाराने पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतरचे असावे. त्यानुसारच उमेदवारांना गुण देण्यात येईल.

१७) उमेदवारांनी अर्जावर त्यांचे अद्यावत असलेले ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक अचुक नोंदवावे. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहिल, याची दक्षता घ्यावी.

१८) महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये **लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन नमूना-अ** या प्रपत्रात अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अर्जाचा विचार केल्या जाणार नाही.

१९) उमेदवाराने अधिवास व राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२०) शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी २००९ नूसार खुला (अमागास), अनूसुचीत जाती/ अनूसुचीत जमाती प्रवर्ग वगळता इतर मागास प्रर्वगातील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

२१) भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे ईत्यादी सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद गडचिरोली | जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद गडचिरोली | जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक<br>रा.आ.अ. गडचिरोली |

| पासपोर्ट साईझ फोटो चिटकवावे व १ अतिरीक्त फोटो अर्जासोबत जोडावा |
|---|

## अर्जाचा नमूना

## लसिकरण क्षेत्र सनिंयत्रक या पदाकरीता अर्ज

**अर्जाचा प्रवर्ग –** ................................

अर्जदाराचे संपुर्ण नांव :........................................................

पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :........................................................
........................................................
........................................................

दुरध्वनी क्र./मोबाईल क्र. :........................ ई-मेल :........................

जन्मतारीख :...../...../........... (शाळा सोडल्याच्या दाखल्यानूसार)
(दिनांक २५/०९/२०२० रोजीचे वय) .........वर्षे.........महिने..........दिवस

जातीचा प्रवर्ग : .................... जात : ...............

अनूभव असल्यास पदाचे नाव :........................... कालावधी :.....वर्षे.....महिने
कार्यालयाचे नांव :..........................................................................

**शैक्षणिक अर्हता –**

| पात्रता परिक्षेचे नांव | मंडळ/ विद्यापिठाचे नांव | अंतिम वर्ष / सेमिस्टरचे गुण | | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण गुण | मिळालेले गुण | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

इतर अहर्ता : ........................................................
........................................................
........................................................

दिनांक :
स्थळ :

( )
उमेदवाराची स्वाक्षरी

**अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे (✓ अशी खुण करावी)**

| | |
|---|---|
| १) शाळा सोडल्याचा दाखला | ७) टंकलेखन प्रमाणपत्र. |
| २) पदवी प्रमाणपत्र | ८) जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास) |
| ३) पदवी अंतिम वर्ष/ सेमिस्टर गुणपत्रीका | ९) अनूभव प्रमाणपत्र |
| ४) जात प्रमाणपत्र | १०) |
| ५) अधिवास प्रमाणपत्र | ११) |
| ६) संगणक अर्हता प्रमाणपत्र | १२) |

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये

### प्रतिज्ञापन
### नमूना-४
### (नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती/कुमारी ..........................................................................
श्री. ............................................ यांचा/यांची मुलगा/मुलगी /पत्नी, वय ........ वर्षे, राहनार ...................... याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी ....................................................... या पदाकरीता माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ......... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....... आहे. (असल्यास जन्मतारीख नमूद करावी.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८ मार्च २००५ व त्यानंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र राहील, याची मला जाणीव आहे.

**(टिप : अविवाहित उमेदवारांनी "लागू नाही" असे नमूद करुन स्वाक्षरी करावी.)**

ठिकाण :
दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी